**पुणे महानगरपालिका**
आपत्ती व्यवस्थापन विभाग
जावक क्र. १६४
दिनांक. २९/०५/२०२०

**कार्यालयीन परिपत्रक**

**विषय :-** पावसाळ्यापुर्वी व पावसाळ्यादरम्यान करावयाची आपत्कालीन कामे व आपत्ती व्यवस्थापन याकरीता आपत्कालीन कार्यकेंद्र स्थापन करणे बाबत.

पावसाळ्यापुर्वी व पावसाळ्या दरम्यान आणि आपत्ती व्यवस्थापनाकरीता महापालिका सहाय्यक आयुक्त स्थरावर आपत्कालीन कार्य केंद्र असणे आवश्यक आहे. आपत्कालीन कार्यकेंद्रात संपर्क यंत्रणा उभारुन क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांची नेमणुक करावी व याकरीता नोडल ऑफिसरची नेमणुक करण्यात यावी. दि.०१जुन ते ३० सप्टेंबर या चार महिन्याचे कालावधी मध्ये आपत्कालीन केंद्र २४×७ तास सुरु राहील याची दक्षता घ्यावी व याकरीता स्टाफची नेमणुक करण्यात यावी. आपत्कालीन केंद्रामध्ये २४ तास संपर्क होऊ शकेल असा दुरध्वनी क्रमांक, नोडल ऑफिसरचा मोबाईल क्रमांक, ई-मेल आय.डी व त्याचप्रमाणे क्षेत्रीय स्तरावर पुरविण्यात आलेल्या वायरलेस यंत्रणा यांचा उपयोग करुन मुख्य आपत्कालीन केंद्राशी जोडण्यात यावा व आपत्कालीन परिस्थितीमध्ये क्षेत्रीय स्तरावरील संपुर्ण माहिती मुख्य आपत्कालीन केंद्र, मुख्य इमारत, पुणे महानगरपालिका येथे दुरध्वनी क्रमांक ०२० - २५५०६८००/१/२/३/४ व ०२० - २५५०१२६९ या क्रमांकावर संपर्क साधण्यात यावा.

सन २०२० -२१ मध्ये पावसाळी लाईनची साफसफाई,ड्रेनेज लाईनची साफसफाई तसेच नाले व कलव्हर्टची साफसफाईची कामे मुख्य खात्यांमार्फत करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने मुख्य खात्यामार्फत क्षेत्रिय स्तरावर नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती ओढविल्यास तात्काळ प्रतिसाद देणेकरीता २५ व्यक्तिंची टिम तयार ठेवावी जेणे करुन इमारत कोसळणे, नाला-ओढयाचे पाणी शहरातील विविध भागात शिरणे, नागरिकांना स्थलांतरीत करणे इत्यादी घटनांमध्ये सदर कर्मचाऱ्यांची मदत होईल. तरी वरीलप्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात घ्यावी.

**(शेखर गायकवाड)**
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

**प्रत:** मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ/ज/वि)
यांजकडेस अवलोकनार्थ व माहितीकरीता....

१. मा.संबंधित खातेप्रमुख
२. मा. उप आयुक्त (परिमंडळ क्र. १ ते ५)
३. मा. महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय (१ ते १५)

पुढील आवश्यक त्या कार्यवाही व अंमलबजावणीसाठी...